# होमिओपॅथीचा प्रसार करणाऱ्यांसाठी निकम पुरस्कार देण्यात येणार

**पुणे, दि.५- वेगवान व प्रभावी उपचारपद्धती म्हणून ओळखल्या जाणाऱ्या होमिओपॅथीचा प्रसार करण्यासाठी झटणाऱ्या व्यक्ती व संस्थांसाठी पुण्यातील आदित्य होमिओपॅथिक हॉस्पिटल व हीलिंग सेंटर यांच्यातर्फे कै. डॉ. डी. व्ही. निकम यांच्या स्मरणार्थ अखिल भारतीय स्तरावर पुरस्कार देण्यात येणार आहेत.**

आदित्य होमिओपॅथिक हॉस्पिटल व हीलिंग सेंटरचे प्रसिद्ध होमिओपॅथिक तज्ज्ञ डॉ. अमरसिंह निकम यांनी पत्रकार परिषदेत याबाबतची माहिती दिली. ते म्हणाले, जनतेत आरोग्याविषयी जागरूकता निर्माण होत असतानाही विविध चाचण्या, अनावश्यक औषधे, कट प्रॅक्टीस यामुळे वैद्यकीय उपचार प्रचंड महाग झाले आहेत. संधीवात, रक्तदाब, मधुमेह, मूत्रपिंड तसेच यकृत निकामी होणे अशा अनेक विकारांवर खात्रीलायक उपचार सध्या उपलब्ध नाहीत, त्यामुळे गोळ्या-औषधे आयुष्यभर घेण्याची पाळी रुग्णांवर येते. होमिओपॅथीत या रोगांवर रामबाण उपचार आहेत. मात्र, हे उपचार सर्वसामान्यांपर्यंत पोहोचण्यासाठी होमिपॅथीबद्दल जागरूकता निर्माण होण्याची गरज आहे. या प्रयत्नांचा एक भाग म्हणून हे पुरस्कार दिले जाणार आहेत.

होमिओपॅथी महाविद्यालयाचे प्राचार्य-प्राध्यापक, होमिओपॅथी विषयक लिखाण करणारे लेखक, होमिओपॅथी शिकणारे विद्यार्थी व होमिओपॅथी डॉक्टर अशा गटांमधून उल्लेखनीय कामाबद्दल अखिल भारतीय स्तरावर हे पुरस्कार दिले जाणार आहेत. या पुरस्कारांची घोषणा फेब्रुवारी महिन्याच्या शेवटी केली जाणार असून ११ मार्च या कै. डॉ. डी. व्ही. निकम यांच्या स्मृतिदिनी पुरस्कार वितरण केले जाणार आहे. सन्मानचिन्ह व मानपत्र असे या पुरस्काराचे स्वरूप आहे, अशी माहिती या पत्रकार परिषदेत देण्यात आली.

Prabhat, Pune, Sunday February 6, 2005